**नियमित दिवाणी दावा क्र. १४५/२०२२ मधील निशाणी क्र. ५८ वरील आदेश**

(निवृत्ती फोकणे वि. काशिनाथ फोकणे व इतर)

(सीएनआर नं. एमएचएनएस२३००१६१३—२०२२)

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १३ विरुध्द दावा अवसायन पावल्याचा आदेश रदद् होणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे विव्दान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** प्रतिवादी क्र. १३ मुत्यु दिनांक १४.०९.२०२३ रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर प्रतिवादीचे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक १४.१२.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे प्रतिवादी विरुध्द दावा अवसायन पावला आहे. कायदेशिर तरतदुींप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता प्रस्तुत अर्ज दि.१४.०२.२०२३ किंवा त्यापुर्वी दाखल करणे आवश्यक आहे. परंतु वादीने प्रस्तुत अर्ज दि. २२/०१/२०२६ रोजी दाखल केला आहे. नि. ५६ वरील आदेशाप्रमाणे प्रस्तुत अर्ज दाखल करणेस झालेला विलंब खर्चासह माफ करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. १३ चे पश्चात त्याचे कायदेशिर प्रतिनिधी विरुध्द प्रस्तुत दावा चालविण्याचे अधिकार वादीला प्राप्त होतात. सबब, प्रतिवादी क्र. १३ विरुध्द दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करणे न्यायाचे दृष्टिने आवश्यक व गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १३ विरुध्दचा दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2026.07.18 14:59:38 +0530

स्थळ:— इगतपुरी ( मो. द. ननवरे )

दिनांक:— १८/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इगतपुरी.